PRABODHAN SHIKSHANPRA PRASARAK0 SANSTHA'S (Regd.NO.E-697 Ratnagiri)

**RAJENDRA MANE COLLEGE OF ENGINEERING AND TECHNOLOGY**

**Recognised by AICTE, Affiliated to Mumbai University**

Office : At & Po – Ambav (Devrukh) Tal – Sangmeshwar, Dist – Ratnagiri, Pin – 415804 (Maharastra)

☎ : (02354) 40992/41501 • Fax No. (02354) 41502 • Email : info@rmcet.com • Website : www.rmcet.com

Date**: 04/07/2017**

# राजेंद्र माने महाविद्यालयात वृक्षारोपण!!




फोटो: वृक्षारोपण करताना संस्थाध्यक्ष श्री.रवींद्रजी माने, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महेश भागवत, नेचर क्लब प्रमुख प्रा. मंगेश प्रभावळकर,शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी

महाराष्ट्र शासन निर्देशानुसार जुलैच्या पहिल्या सप्ताहात महाराष्ट्र राज्यात वृक्ष लागवडीचा उपक्रम हाती घेऊन दरवर्षी वनमहोत्सव साजरा करण्यात येतो. यावर्षी महाराष्ट्र राज्यात ४ कोटी वृक्ष लागवडीचा निर्धार करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने प्रबोधन शिक्षण प्रसारक संस्थेच्या राजेंद्र माने अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये वृक्षारोपण करण्यात आले.

महाविद्यालयातील नेचर क्लब तर्फे आयोजित केलेल्या या कार्यक्रमामध्ये संस्थाध्यक्ष श्री.रवींद्रजी माने, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महेश भागवत, नेचर क्लब प्रमुख प्रा. मंगेश प्रभावळकर,विविध

विभागप्रमुख,शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सर्वप्रथम संस्थाध्यक्ष व प्राचार्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

त्यानंतर महाविद्यालयाच्या प्रांगणात नारळ, काजू, कडुलिंब इ.जातींच्या, विविध प्रकारच्या 60 वृक्षांचे रोपण करण्यात आले. याप्रसंगी अनौपचारिक संभाषणात संस्थाध्यक्ष श्री.रवींद्र माने यांनी वृक्ष ही काळाची गरज असून वृक्षसंवर्धनाचे महत्त्व विषद केले तसेच नारळाच्या विविध जातींची माहिती दिली .

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी नेचर क्लबचे प्रा. मंगेश प्रभावळकर यांनी नियोजन केले.यशस्वितेसाठी सचिन शिंदे, उमेश शिर्के, नेचर क्लबचे विद्यार्थी प्रतिनिधी यांनी परिश्रम घेतले.